ग्रं. २३४

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
काव्य

लेखक गो. ना. कानिटकर

सन १८८८

संग्रहालय क्रमांक
७६
२

पुस्तकांचें नांव अकबर बादशाहा

238

२३४
काव्य.

[illegible] ८३

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

नं. ८३

Dakshina Prize Committee's Prize Poem.

# EMPEROR AKABAR

BY

GOVIND VASUDEO KANITKAR B. A.

'I had been still a happy king of men.'

Oh! let us pay the time but needful woe
Since it hath been beforehand with our griefs——

SHAKESPEARE

BOMBAY

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS.

1879.

*Price Ten Annas.*

(*Registered under Act* XXV *of* 1867)

बा काव्य ५८
२

दक्षिणा प्रैझ कमिटीनें बक्षिस दिलेला ग्रंथ.

# अकबर बादशाहा.

हें लहानसें मराठी काव्य,

गोविंद वासुदेव कानिटकर बी. ए.

याणीं रचिलें.

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।
साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥

गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः ।

मुंबई,
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.
सन १८७९ इ०.

किंमत दहा आणे.

(हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिला आहे.)

# INTRODUCTION

This short poem of "Akabar" was composed by me some eight or nine years ago and submitted to the well known "Dakshina Prize Committee of Poona, who, as an encouragement to the cultivation of Marathi poetry, awarded a handsome prize to the writer Since that distant date, the manuscript had been lying in the drawers of my table, and its fate seemed doubtful It is essentially the production of boyhood's fancy, and is, therefore naturally destitute of much historical truth Although it is, in general, based on history, its historical value is not very considerable. But the business of the poet is distint from that of the historian. "Where the historian bound by an oath to the severest truth in every single statement may at the most permit us to devine the causes of events and the motives of actions from the bare naration of facts, the poet, who seeks to draw from these facts only a general moral truth and not one of fact, unites by poetic fiction, the actions and the actors in a distinct living relation of cause & effect, .. ... ... the more freely and boldly he does this, the more poetically interesting will his treatment of the history become, but the more will it lose its historical value, the more closely and truly he adheres to reality, the more will his poetry gain in historical meaning but forfeit in poetical splendour '

This extract, from a well known Shakespearian critic, will, I hope, sufficiently explain my position. At the time, when I wrote this piece, I had on the tablet of my memory a record of all the popular tales and legends of the life of Akabar and his reign All these I connected

together and turned them into a poem, adding, of course, whatever my wild fancy then suggested to me

I have especially enlarged on two well-known legends touching the Mogal Emperor's life, viz that about Jagannath Rai Pandit, and the other, about the introduction of gold mohors of Akabar's reign Akabar, though a Mogal and belonging to an alien race, was deeply respected and loved by his Hindu subjects. Like the gentle Râma or Harischandra of old, Akabar lays a just claim to our esteem He was in every sense the father of those over whom he ruled. He has left a bright example to those to whom providence has been pleased to entrust the destinies of a foreign race

It is much to be regretted that a variety of causes should have prevented me from publishing the poem upto this time. As it is, if my labours should be properly appreciated by the public and if I should succeed in making the already popular name of Akabar still more popular and endearing to my fellow countrymen, I should feel amply repaid

In conclusion, I heartily thank those of my friends who rendered me valuable assistance in the publication of this poem

G W. KANITKAR

# प्रस्तावना.

मेहेरबान दक्षिणा प्रैझ कमिटीनें आठ नऊ वर्षांमागें अकबर बादशाहावर काव्य लिहिणारास बक्षीस देण्याचें जाहीर केल्यावरून मी हें काव्य रचिलें. त्यावेळीं माझें वयही थोडें असून शाळेंत विद्यार्थी होतों. इतिहासाचें ज्ञानही तादृश नव्हतें ह्मणण्यास हरकत नाहीं; तथापी त्या वेळीं अकबराविषयीं जी थोडी माहिती होती व कित्येक आख्यायिका ऐकिवांत होत्या त्या एकत्र करून प्रस्तुत काव्य मी रचिलें. या कारणानें त्यांत अकबराविषयीं ऐतिहासिक माहिती फार थोडी आणि आहे ती सुद्धा फारशी विश्वसनीय नाहीं असें आढळेल. तथापि 'इतिहासाचा उत्तमपणा त्यांतील मजकुराच्या खरेपणावर जितका असतो तितका काव्याचा असत नाहीं. व कवित्वाची पारख वरील कारागिरीवरूनच मुख्यतः करावयाची असून मूळ द्रव्याची मातबरी रसज्ञ तादृश धरीत नसतात.'

या काव्याचे भाग पांच, त्यांचा भागश: सारांश:—

[ १ ] शीरशाहानें हाकून लाविल्यावर हुमायून इराणच्या दरबारीं पळून जातो. या प्रवासामध्ये त्यास अकबर हा पुत्र होतो; पुढें इराणच्या शहाच्या मदतीनें तो आपली गादी मिळवितो व थोडे दिवस राज्योपभोग घेऊन, अकबर लहान असेपर्यंत, बहिराम नावाच्या प्रधानाच्या स्वाधीन राज्य कारभार करून तो मरण पावतो [२] १३ वर्षें झाल्यावर अकबरास राज्याभिषेक होतो; त्याच्यावर शत्रूंनीं पाठविलेल्या सैन्याचा तो पराभव करितो; पुढें त्याचें मोठ्या थाटानें लग्न होतें, नंतर त्याची स्त्री गरोदर राहते व मास पुरे झाल्यावर कन्या प्रसवते ( जिचें पुढें जगन्नाथराय पंडिताशीं लग्न झालें आहे ) [३] यात ज-

गन्नाथराय पंडिताबद्दल हकीगत आहे. अकबराला दुसरे धर्म समजून घेण्याची उत्सुकता व ख्रिस्ती धर्मोपदेशकाचें नैराश्य याचें कथन आहे [ ४ ] उपवनामध्यें बादशाहाचे मुलीची व जगन्नाथरायाची दृष्टादृष्ट होते व दोघाच्याही मनात एकमेकाविषयीं प्रीति उद्भवते. ही सर्व गोष्ट पंडित हा युक्तीनें बादशाहास कळवितो व शाहाजादी आपणास बायको करावी म्हणून त्याची प्रार्थना करितो, हा बाद जाण्यासाठी मुसलमान होशील तर मुलगी देतों म्हणून बादशाहा त्यास सागतो; जगन्नाथराय या गोष्टीस कबूल होऊन आपला इष्ट हेतु सिद्धीस नेतो. यावनी बायको केल्यानें ब्राम्हण लोक त्याचा छळ करतात; म्हणून तो गंगेची स्तुति करतो, प्रत्येक श्लोकासरशी भागीरथी एकेक पायरी चढून ज्याठिकाणी जगन्नाथराय स्त्रीसहवर्तमान बसला होता तेथें येऊन त्या दोघास घेऊन मागें परतते [ ५ ] अकबराच्या अमलाविरुद्ध गुजराथेमध्ये वगैरे जीं बंडें झालीं त्याचा त्यानें कसा मोड केला या हकीगतीनें पांचव्या भागास आरंभ होतो. नंतर लोकाच्या कल्याणाकरिता व सुखाकरिता त्याणे जी अनेक कृत्यें केली त्याचें वर्णन आहे आणि ज्या अकबरी मोहोराविषयीं सर्वत्र प्रसिद्धि आहे त्या प्रचारात कशा आल्या हें सागून पाचव्या भागाचा व सर्व काव्याचा शेवट केला आहे.

या काव्यामध्यें बरेच दोष राहिले असावे असें माझें मलाच वाटतें व ते सुधरतांही आले असते. परंतु द० प्रै. कमिटीस पसत पडलेली माझी कृति कशी होती हें लोकांस समजावें यासाठीं जसेंच्या तसेंच, ऱ्हस्व दीर्घाचे अल्प स्वल्प दोष शुद्ध करून, छापविलें आहे. गुणदोष विवेचकास, या काव्याची परीक्षा करितानां तें केव्हां लिहिलें होतें हें लक्षांत बाळगण्याविषयीं विनती आहे.

गो. बा. कानिटकर.

Bhagwant Hari Shringarpure
वा ता० ०४ ८६
and
15th June, 94

# अकबर बादशहा

## यावर काव्य.

### भाग १.

### मंगलाचरण.

[ शिखरिणी ].

जयाच्या सत्तेनें त्रिभुवन सदा चालत असे,
जगीं ज्याचीं कृत्यें दिसति, अति चातुर्यहि तसें,
धनी जो सर्वांचा, सदयहृदयें पालन करी,
अशा देवा ! याची मदत कविला या अवसरीं. १

[ मंदाक्रांता ]

रानोरानीं फिरफिरुनियां धुंडिलें सर्व कांहीं,
तो विश्वात्मा परि गवसला, सत्य हो सत्य, नाहीं !
जें जें नेत्रीं सहज पडतें त्या ठिकाणीं वसे तो
ऐसें वाटे, पण न मनुजा कां प्रभू दृश्य होतो ! २

[ शिखरिणी ].

वसे सर्व स्थानीं, तरि न जड वस्तूच बनला;
जडाचें घे रूप प्रभु, तरि तया अंत भिडला[1];
अगा विश्वेशा हे ! क्षणभरिच माझ्या मनिं दिसें !
तयीं पापाचें या दहन सगळें होइ न कसें ! ३

---

१ परमेश्वर सान्त ( नश्वर ) असें होतें.

[ द्रुतविलंबित ].

कृति तुझी जगतीवर, ईश्वरा !
बघुनि उत्सुक दास तुझा खरा
तव पदांबुजदर्शन वांछितो,
ह्मणुनियां तुज सादर वंदितो. ४

[ शिखरिणी ].

दयामेघा ! पापानळ सतत जाळी शरिर हें;
झुरें मी दुःखाग्नीमधिं पडुनि त्वत्पादविरहें;
अशा या पापात्म्यावरि करिं विभो लोभ अपुला;
मला तारीं आतां शरण जन हा येइ तुजला. ५

[ पृथ्वी ].

विशुद्ध रमणीय हें नभ कसें दयाळा ! असे !
तयीं दिसतसे अहा ! सकळ तारकाराष्ट्रसें[1];
परी बघतसे तुला जन न पापि राज्यामनीं
ह्मणोनि मज लाभ तो मुळिं न जीवनापासुनी. ६

[ हरिणी ].

बहुत शिणलों राया ! येवो तुला करुणा कशी,
धरुनि मजला पोटाशीं तूं कधीं वदसी मशीं?
तुजवरि वसो श्रद्धा देवा ! तुझें पद दाखवी,
सहज मज तें अज्ञानाच्या तमांतुनि सोडवी. ७

---

१ तान्यांचे राष्ट्र

वा काव्य ५६



[ भुजंगप्रयात ]

जगीं पाहुनी थोर सत्ता तयाची,
विचित्रप्रभावा कृती तीहि साची,
पुढें जाणुनी सत्यरूप, प्रभूतें
स्वधर्मीं नमोनी भजावें तयातें. ८

असा काळ जातां करी तोच मुक्त
स्वभक्तास पाहोनि भक्तयानुरक्त,
सदा रूप त्याचें दिसाया झटावें,
तरी या जगीं जीवनातें धरावें. ९

"करीं वा कृपाळा ! दया प्रेमपूर्णा !
सदानंद देवा ! जगज्जीवनर्णा !"
असें प्रार्थितां त्वत्प्रसादाप्ति होवो,
स्वबुद्धिभ्रमाची सदा भीति जावो. १०

[ शिखरिणी ].

सुटे वारा, साला विदित तव आज्ञा ह्मणुनिया;
ह्मणोनीही सूर्य प्रतिदिनिं तसा येइ उदया;
तशी चंद्रालाही कमलरमणा रात्रिपतिला,
तमाच्या नाशानें प्रकट करितो जो निजबला. ११

[ द्रुतविलंबित ].

नव जणों शिशु मातृकरा धरी,
जननि ती मग साह्य जशी करी,

---

१ विचित्र आहे प्रभाव जीचा अशी ( कृति ).

तुजवरी प्रभु तेंवि खरा असे
भरंवसा, ह्मणुनी नच भीतसें. १२

[ शिखरिणी ].

जरी चातुर्यानें सकल वसुधा पूर्ण दिसते,
जरी या ईशाची कृति उघड दृष्टीस पडते,
जरी अस्तित्वाचीं बहुत परिमाणें असति तीं,
तरी होई देवा ! मन कधिं कधीं नास्तिक किती? १३

[ शार्दूलविक्रीडित ].

जें जें इंद्रिय दीधलें विषय तो तो भिन्न त्याणें कळे,
कर्णाला[१] ध्वनिमात्र हो श्रुत सदा, त्याला रुची नाकळे,
नेत्रांनीं विविधाकृती सुभगशा सद्वस्तु त्या दीसती,
नासालाहि सुगंध वस्तु मिळती तेणें सुखें लाभती. १४
या पंचेंद्रियसद्गुणाहुनि दुजें जें श्रेष्ठ ऐसें असे,
त्याला सर्व पराक्रमी प्रभु असा ब्रह्मांडभांडीं दिसे;
अंधाला न पदार्थ सुंदर मुळीं देखावया शक्ति ती,
तैसे अज्ञ "जगांत ईश्वर नसे" ऐसें मुखें बोलती. १५

[ शालिनी ].

प्राणाचा जो प्राण तूं देवराया !
'आत्म्यामध्यें प्रेरणा' दे[२] वरा या.
स्वतेजाचें[३] ज्ञान होतांच मातें,
सौख्या पावे जीव हा, लोकमाते ! १६

---

१ कानाला. २ हा वर दे. ३ ईश्वराचें विशेषण.

[ हरिणी ].

त्रिभुवनिं सदा पाहीं जें जें विचारनिमग्न मी,
"सकळहि तुझें आहे" ऐसें ह्मणोनि तुला नमीं.
मनुज वदतो " हें माझें हें तुझें " जरि सर्वदा,
जगत मिळतें अंतीं सारें पुनश्च तुझ्या पदा. १७

[ आर्या ]

" दुष्टांनीं गांजावे सुष्ट सदा " लोकिं हें असें गमतें,
परि सुष्ट सज्जनांच्या राहति निःसंशयेंच सुभग मतें. १८
तत्त्व असें जाणोनी कविता करण्यास मी करीं यत्न,
शोधांतीं वेऱ्यांतें एक तरी सांपडेल जयिं रत्न. १९

[ उपजाति ]

गुणीजनाचा गुण घेति सुज्ञ,
जाणे तया केंवि यथार्थ अज्ञ ?
रत्नें मिळालीं जरि पारख्यास,
तेव्हांच हो मोल तदीय खास. २०

---

## कथाप्रकारंभ.

---

[ भुजंगप्रयात ]

मला शारदे ! सांग तो कोण होता
मुसल्मान राजा जना सौख्यदाता ?
जयाची असे कीर्ति या देशिं फार,
जया मान देती तसा लोक थोर ? २१

मनीं त्वेष त्याच्या, तरी शांति होती,
असे स्वस्थता तेंवि राज्यांत गे ती;
लढायास जैसा सदा शूर वीर,
प्रजेच्या तसा रक्षणीं दक्ष फार. २२
कुठें पूर्वजांचें तयाच्या रहाणें ?
कुठें गादि ती ? यावनाचें घराणें ?
कुठें दिल्लि आहे ? कुठें काय आहे ?
मला सांग तूं शारदे ! प्रेरुनी हें. २३

[ द्रुतविलंबित ].

यवन ते करिती जुलुमा किती !
नच जुमानिति ! शस्त्रहि दाविती !
जबरदस्ति करोनिच आपुला
यवनधर्म पहा जनिं लाविला ! २४

[ भुजंगप्रयात ]

हणाया निघाले मुसल्मान दुष्ट,
अहा ! जीव ते घेउनी होति तुष्ट;
कसे दांडगे हातिं तर्वार घेती
कुराणा न जो वाचि त्या मारिताती. २५
अशी फार गर्दी कराया तयार,
कडाक्का किती मांडिती देशिं थोर,
दिसे जेथतेथें मुसल्मानि बाणा,
सदा गर्जना "कांटुनी टाक ! हाणा !" २६

रणीं माजले ते न कांहींच चाले,
न कोणी तसा भीतिनें कांहिं बोले,
मुकाटे विचारे असे लोक तेव्हां,
बहू मांडिला त्यांनिं कल्होळ जेव्हां. २७

[ द्रुतविलंबित ].

दिसतसे रडणें सगळीकडे,
सुख ह्मणोनि कुठेंहि न सांपडे;
भरभरां जुलमें मरती किती,
कितिक जाति पळून. अशी भिती ! २८

[ शालिनी ]

जाती कोणी सोडुनी ते स्वदेशा,
कोठेंही त्यां आसरा नाहिं आशा,
ज्याला त्याला जीव जावो असें हो,
ऐशा काळीं दुर्दशा काय ती हो ! २९

[ भुजगप्रयात ]

"धरा ! यास मारा ! पहातांच काय ?"
असा शब्द कानीं पडे तो न माय.
"कुटा हो ! कुटा हो !" असें कोणि बोले,
मदोन्मत्त मारी सुरापानिं डोले. ३०

[ शालिनी ]

होते तेव्हां वीर हिंदू सपाटे,
त्यांचें मोठें शौर्य आंगींच दाटे;

कोणाचीही होइना छाति जाया
युद्धामध्यें यावनांशीं झुजाया. ३१

[ भुजगप्रयात ].

रणीं रक्त वाहे. सदा लोट चाले.
बडा शूर तेव्हां स्वधामांत डोले.
परी शस्त्र जागींच राहे पडोनी,
जणों स्थान सोडी न भीती धरोनी. ३२
स्त्रियांच्या वरी जोर चाले बहूत,
दया येइना, चोरुनी त्यांस नेत,
मदोन्मत्त ते दुष्ट झाले बलिष्ट,
अती गांजले सर्व देशांत सुष्ट. ३३
" अहा! काळ खायास ये काय ?" वाटे,
जना दुःख होई. तसा देश वाटे.
अशा वेळिं येई दया श्रीहरीला,
धनी चांगला सत्वरें पाठवीला. ३४
ह्युमायून गादीवरी जों बसे, तों
स्वराज्यांत दंगा महाथोर होतो.
जुमानी न कोणी; न ऐके नृपाला;
असा काळ तेव्हां झपाटा निघाला. ३५

[ शालिनी ].

बंडें मोठीं होउनी जागजागीं
वीर्यश्रीची मूर्ति राहेच जागी.

त्या राजाला राज्य तें आटपेना,
तेणें चिन्हें होति उद्भूत नाना. ३६

[ द्रुतविलम्बित ].

शिरशहा वळकाउनि गादितें,
जनसुखास्तव योजित युक्तितें;
बहुत यत्न करी सुधरावया,
सकळ राज्यहि आपण घ्यावया. ३७

[ शालिनी ].

स्थानीं स्थानीं योग्य कामें करोनी,
मोठे मोठे बंगले बांधवोनी,
लोकांमाजीं गाजवी कीर्ति फार,
होई तेणें हर्ष चित्तांत गार. ३८

रस्ते मोठे तेंवि बांधोनि कोठें,
पाण्याचेही योग्य केलेत सांठे,
कोठें जंगी पूल नाल्यांस केले,
तैसे कोठें खोदवी थोर नाले. ३९

[ भुजंगप्रयात ].

करी बंद साऱ्या लुटारूपणाला,
जयांचा असे त्रास मोठा जनाला;
अशा युक्तिनीं तुष्ट होती समस्त,
नयाला दुवा नित्य ते लोक देत. ४०

[ शालिनी ].

मृत्यू येतां सुज्ञ या भूपतीला,
झाला मोठा शोक तेव्हां प्रजेला.
" गेला ! गेला ! आमुचा सौख्यदाता !
त्राता ऐसा नाहिं होणार आतां ! " ४१

[ स्वागता ].

ज्येष्ठपुत्र मग गादि मेळवी,
राज्य तो न परि योग्य चालवी;
नीतिनें नृप सदा असे जरी,
शोभतें पद तयास तें तरी. ४२

[ भुजंगप्रयात ]

झटे फार तेव्हां हुमायून राया
पुन्हा आपलें स्थानही प्राप्त व्हाया,
मुळीं लागला यत्न सातें न कांहीं,
प्रजा सर्व जेव्हां अतिक्लेश वाही. ४३

[ दिंडी ]

काय इकडे जाहलें वर्त्तमान,
हुमायूनाचें दैव तें फिरोन,
शीरशहानें जिंकिलें त्यास जेव्हां,
पळा जाई फारशीदेशिं तेव्हां. ४४

---

१ परशिया देश.

[ भुजंगप्रयात ].

असे चालतां चालतां रान आलें,
जिथें वृक्ष मोठे मधोनी निघाले;
बहू-किर्र झाडी, महाश्वापदें तीं,
जयीं गर्जती उद्भवे फार भीती. ४५

[ दिंडी ]

मार्ग त्याला होइ तो क्लेशदाता,
फार दु:खें सोशिलीं वाट जातां;
दैव झालें जरि एकदां विरुद्ध,
तरी राहे कांहीं न तया शुद्ध. ४६

[ भुजंगप्रयात ]

स्वसेनेसवें रानिं जेव्हां फिरे तो,
तयाला सुदैवें पहा पुत्र होतो;
तयीं बाळकाच्या करीं द्यावया ती,
न कांहींच वस्तू तयापाशिं होती. ४७
ह्मणे काय हे दाविले दीस? देवा !
" न या हातुनी जाहली सत्सुसेवा
" ह्मणोनी असा काळ रानांत यावा !
" असा देखणा पुत्र येथेंच व्हावा ! ४८
" अशा या प्रसंगीं स्वराज्यांत होता
" कधींही न हा दीस ऐसाच जाता.
" जसे द्यावया गोड वस्तू शिशूतें
"तशी देणगी राजरोजी न यातें !" ४९

[ द्रुतविलंबित ]

करि असा अति दीनपणें पिता
बहुत शोक, धरोनि करीं सुता;
बघुनि सुंदर बाळमुखाकडे
स्मरुनि तो वनवास अहा! रडे. ५०

[ शिखरिणी ]

" तुझ्या नांवानें बा गजर बहु व्हावा स्वनगरीं,
" विपत्तीमध्यें या तुज सुख विधी होइ न, परी
" करावा ज्या वेळीं सकळरमणीयोत्सव जनीं,
" अहा कैसा येई समय भगवन् ! निर्जनवनीं !"५१

[ भुजंगप्रयात ].

असें दुःख जों हा करी, तत्प्रिया तीं
रडे सुंदरी आठवोनी विपत्ती.
विशेषें तिच्या दुःख हो जें पतीतें,
तयें आंवरेना मुळीं शोक तीतें. ५२
पती त्या प्रसंगीं वदे तीस कांहीं,
" तुझ्या मानसीं कां सखे ! हर्ष नाहीं !
" शरीरास भारी व्यथा घेशि कां ? गे !
" करोनी प्रिये सांगही तूंच अंगें ! ५३

[ द्रुतविलंबित ]

" समय हा रडण्यास नसे प्रिये !
" सुत दिला सदयें प्रभुनें तयें,

" तरि पुरा करिं शोक, नको रडूं,
" धरणिच्या वरतीहि नको पडूं. ५४

[ मदाक्राता ].

" पक्षी वृक्षींवर बसुनियां गाति गाणीं मधूर,
" ही आंब्याची धरुनि कलिका कोकिळा काढि सूर,
" या बाळाला बघुनि अवघे हृष्ट होती मयूर,
" मोठ्या डौलें पसरुनि पिसें नाचती हे चतूर. ५५

[ तोटक ].

" तरु हे शिशुच्या वर सुंदरसे
" बघ सांवलि ढाळिति सर्व कसे,
" पवन श्रमहारि सुवासबळें
" मजला जणुं हा मधुलोभ कळे ५६

[ मंदाक्राता ].

" विश्वेशाची प्रबळ सखये जेंवि इच्छा असेल,
" तैसें तैसें खचित मनुजालागिं तेव्हां घडेल. "
केलें त्यानें बहुविध असें हो समाधान तीचें,
प्रेमें मोठ्या पुसुनि नयनांतील तें अश्रु साचें. ५७

[ शुद्धकामदा ]

स्मरण जाहलें त्या क्षणीं तया,
ह्मणुन ऊठला सोडुनी प्रिया;
हरिणनाभि जी जवळ होति ती,
लवकरी करीं फोडि तो कृती. ५८

शिशुमुखाकडे पाहुनी वदे,
" तव मुला ! मला हस्त सौम्य दे.
" मधुर हा किती स्पर्श वाटतो !
" खचित जो पहा दिव्य भासतो ! ५९

[ शालिनी ].

" कस्तूरीचा वास वायूंत वाहे,
" कीर्ती वाहो याप्रमाणें मुला ! हे !
" हिच्या गंधें मानसीं हर्ष होई,
" तैसा तूंही सौख्य लोकांस देई." ६०
आनंदाचा पूर येई तयाला,
प्रेमाश्रूंचा लोट नेत्रांत आला;
पुत्राचें तें देखतां वक्त्र रम्य,
दुःखामध्यें सौख्य झालें अगम्य. ६१

[ स्वागता ]

बोलला जनक शब्द कौतुकें
बाळ सुंदर सलक्ष आयके !
जाणुनी सकळ हेतु हांसला,
तों पिता बघुनि हें सुखावला. ६२

[ भुजगप्रयात ].

प्रवासांत झाला तया फार शीण,
तरी स्वस्थ आतां स्वचित्तांत दीन
महाराज आनंदडोहीं बुडाला;
तसा राणिलाही महा हर्ष झाला. ६३

[ स्वागता ].

सर्व दुःख विसरोनि पूर्विचें
पाहतीं मुख तदा स्वसूनुचें;
बाळकास बघुनी दुजाहि हो
प्रेमपूर्ण; मग कां पिता न हो? ६४

[ आर्या ]

यानंतर परशीया-
देशीं जावोनि राहि तो यवन,
तेथिल राजानेंही
सत्कारुनि त्या दिलें अभय वचन. ६५
दरबारीं आणोनी
दिधलीं वस्त्रें अमूल्य बहुमानें,
येइ तसा प्रतिदिनिं तो
स्वामीला भेटण्यास नेमानें. ६६
यापरि मैत्री जडली,
तैशी प्रीति प्रभूत दोघांची;
सांगति अन्योन्याला,
हितगुज गूढें तशींहि ते मनिचीं. ६७
ह्मूमायून कथी मग,
सगळा वृत्तांत अन्य राजाला;
सौम्य असे यद्वृत्ति,
आली होती जरी जरा त्याला. ६८

धर्मविषयीं होई
वाद कराया तयार जों पहिला,
तों परदेशाचाही
राजा संभाषणेच्छु हो झाला. ६९

[ साक्या ]

काळ असा मग कांहीं गेला बहुत सुखें दोघांचा,
हुमायून तों करी विनंती घेण्या निरोप साचा. ७०
देइ फारशी राजा त्याला सेना शत्रु वधाया;
सर्व सिद्धता करुनि निघाले स्वपुरीं तेव्हां जाया. ७१
ज्या बंधूंनीं द्वेषें त्याशीं केलें बंड अघोर,
पराभूत ते करुनी दोघे मेळविला अधिकार. ७२
बरी स्वस्थता देशीं राहे; राज्य सुखानें चाले;
विघ्नें तेव्हां जाति पळोनी, शत्रु सर्वही गेले. ७३
परी नृपाचा शेवट आला जणों तया भेटाया,
सवें घेउनी यम मृत्यूला कीं सत्वर ये न्याया. ७४
अकस्मात एक्या दिवशीं तो आला मौज कराया,
किल्ल्यावरती उभा राहुनी शोभा पाहत राया; ७५
समीप होतें मंत्रीमंडळ, तसा प्रधानहि होता,
वारा सुटला बराच तेणें खालिं न येइ पहातां. ७६
गडी माणसें अनेक आपुल्या स्थानीं स्थानिं बसोनी
गोष्टी करिती आनंदानें, सुखानुभव घेवोनी. ७७

सुगंध शीतळ पदार्थ सेविति उणें न भासे कांहीं
जागा मोठी होति मनोहर, मूल्य तिचेंही नाहीं. ७८
रस्त्यामाजीं इतक्यामध्यें झाली गडवड मोठी,
ती जाणाया इच्छा होई राजाला बहु खोटी. ७९
धांवत गेला ह्मणुनि सत्वरें खिडकीपाशीं राय,
त्या वेगानें भान न राहुनि अवघा खालीं जाय. ८०
भयाभीत सगळे मग झाले, ओरड होई भारी,
ह्मणती कोणी प्रार्थुनि देवा, "संकट तूंच निवारीं." ८१
ह्युमायून बेशुद्ध होउनी, पडला त्या मैदानीं;
जमती सारे सभोंवार ते सेवकजन अभिमानी. ८२
उपाय करिती अनेक ऐसे, विपुळ शिंपिती नीर,
वारा घाली कोणी अनुचर, निश्चळ कोणी वीर. ८३
घालुनि पालखिमधीं तयाला घरीं आणिला जेव्हां,
गेली घटिका एक पूर्ण जों ये आरामच तेव्हां. ८४
मार्ग दिसे स्वर्गाचा त्यातें या वेळेपासोनी,
विरागता येई चित्तीं बहु विषय सर्व जावोनी. ८५
एक मनीं परि आशा होती कीं पुत्रा पाहीन,
प्रेमें उपदेशांकुश धरुनी मन त्याचें वळवीन. ८६

[ द्रुतविलंबित ].

"जवळ ये मनमोहन बाळका !
"अकवरा! मजला अति भीशि कां ?

''तुजशिवाय सख्या मम जीव हा
''तळमळे तरि येथ जरा रहा. ८७
''जरि तुझी जननी परिवर्तली,
''तरि असे तुजला मम सांवली;
''परि इथोनि पुढें परिरक्षिता
''प्रभुविणें दुसरा न असे. सुता ! ८८
''अजुनि मूल तुला ह्मणती जन
''तरि असे बहु खोल तुझें मन,
''तुज पित्यासम मानिति लोक ते
''ह्मणुनि पात्र विशाळ सुकीर्तितें. ८९

[ शार्दूलविक्रीडित ]

''द्रव्यासाठिं करूं नको जुलुम तूं, कोणास गांजूं नको,
''राहूंदे मनिं शांतता, न कधिंही इच्छीं दुजी बायको,
''जो कोणी तुजला विचार अथवा सल्ला तशी देइल,
''त्याचा पूर्विं विवेक फार करितां ये सिद्धिचें तें बळ.

[ भुजगप्रयात ].

''करीं प्रार्थना नित्य तूं स्वप्रभूची,
''असे सर्व कृत्यांवरी दृष्टि ज्याची,
''कुराणांत तूं ठेव भक्ती तुझीरे
''तरी मेळवीलें तुवां येथ सारें. ९१
''असे धर्म हा तेथुनी सर्व एक,
''जरी मानिती भिन्न ते मूढ लोक;

"स्वकर्मी पहा नित्य गुंतोनि जावें,
"सदा सद्गुणाच्या पथीं त्वां निजावें. ९२

[ मंदाक्रांता ].

"या भूलोकीं वसति करुनी देव मीं नाठवीला,
"नाहीं नाहीं क्षणिक सुख हें सोडुनी आळवीला,
"मौजेखालीं दिवस सगळे पातले या नराचे,
"मी दुष्टात्मा खचित इतका कीं नये ईश वाचे. ९३
"कोणाचेंही भय न धरितां केलिं जीं पापकर्मे,
"तीं याकाळीं हृदयिं मजला टोंचती सर्व वर्मे,
"जें जाणोनी करित तुजला सूचना प्रेमपूर्व,
"धर्मानें वा सतत सगळें आचरीं, सोड गर्व." ९४

[ आर्या ]

यापरि उपदेशाचे
शब्द तयाच्या मुखांतुनी निघती,
तों बापाच्या नेत्रीं
दुःखाश्रू स्पष्ट त्या मुला दिसती. ९५
ताताला कवटाळी
प्रेमानें शोकयुक्त होऊन,
बोले या वचनातें,
नयनांतुन गाळितां टिपें ऊन. ९६

[ हरिणी ].

"तुज विनवितों बाबा! आतां न खेद मनीं धरीं,
"सकळहि तुझी चिंता मोठी मदर्थचि आंवरीं,

"विरह बहुधा जाळी नेणों सुत्दहृदया सदा
"मरणसमयीं न्यावें चित्त प्रभुप्रति कामदा". ९७

[ साकी ]

बाळबुद्धि हा असुनी बोले वाक्य शहाणपणाचें,
ऐसें पाहुनि जणुं आनंदें मन अंतरिं तें नाचे. ९८

[ शार्दूलविक्रीडित ].

बापाच्या मरणीं घडे अकबरा श्रीसंग सौख्यासि, हो!
प्रेमानें तरि ज्यास फार हृदयीं शोकव्यथा तेंवि हो,
सृष्टीचा क्रम हा असें समजुनी स्वार्थांकडे तो वळे,
झाला अल्पहि राज्यभार धरण्या स्वीकारुनी आगळें.

[ आर्या ]

बाळक जोंवरि होता
करि तोंपर्यंत राज्य बहिराम,
चतुर बहुत मंत्री हा
सोंपविलें ह्मणुनि हें तया काम. १००

भाग पहिला समाप्त.

## भाग २.

[ शिखरिणी ].

स्वदेशीं जे राजे झटुनि जनकल्याण करिती,
तयांच्या नांवाचा गजर जगिं होई बहुरिती,
तयांचीं सत्कृत्यें श्रवण करुनी लोक वदती,
" अहा रे! तूं राया! खचित असशी धन्य नृपती! १

[ पृथ्वी ].

अलौकिक असें अह्मां सुचिर सौख्य ज्यानें दिलें,
असे यवन जातिचा, सुगुण मोहुनी राहिले,
पुरा विदित बालकांप्रतिहि आपुल्या देशिं या,
स्वयें जनक नांव दे अकबर प्रभूला तया. २

[ द्रुतविलंबित ]

यवन तो परि हिंदुच वाटला,
प्रभु न, माय जनाप्रति भासला,
सकळ पूर्वज दुष्ट जयाप्रती,
तुळस कीं उगवे जणुं भांगिं ती. ३

[ वसंततिलका ].

मारी स्वशत्रु अवघे, मग तत्स्त्रियांचा
तो केशभार हरि, वीर रणांत साचा,
त्यातें अकब्बर ह्मणोनि यथार्थ नाम
लोकीं मिळे, वदति ज्याप्रति सौख्यधाम. ४

[ शिखरिणी ].

नवा राजा होई लवकर पदारूढ ह्मणुनी,
जिथें तेथें मोठी रुचिर विलसे कांति भवनीं;
शशी अस्ता जातां, उदित रवि होतां, सुभगशी
पुरांमध्यें शोभा विविध चमके फारच तशी. ५

[ शार्दूलविक्रीडित ]

खेळे खेळ अनेक पूर्ण धरुनी ईर्ष्या मनीं तो युवा,
फेंकी राय बसोनि वाजिवरती चेंडू पहा आडवा,
किंवा घेउनि कौतुकें निजकरीं भाला झुगारी बळें,
तेणें त्रासुनि कोपयुक्त मग तो हत्ती भयानें पळे. ६

[ रथोद्धता ].

योग्य पाहुनि गडी तयासवें,
युद्ध रोज करण्या शिके नवें;
होइ तो चतुर फार यामधीं,
नाद खास दुसरा न हो कधीं. ७

[ आर्या ]

वय तेरावें लागे
राज्यावरि तो वसे पहा नृपती,
बाळक परि शोभे
बहु, दुसरे भूपति तयापुढें लपती. ८
आनंदित प्रजांचीं
दिसती वदनें तयीं पुरामाजीं,

राज्यश्री ती शोभे
साला, जैशी नरास रामा जी. ९
झाली सर्व तयारी
करिती अभिषेक त्या अकबरास,
जो ईशाच्या कृतिनें
सौंदर्याचीच भासला रास. १०
वाजति अनेक वाद्यें
शहरोशहरीं तमाम सारीं तीं,
इंद्राच्या अभिषेकीं
वाजविती सुर जसे तयें रीती. ११
किंवा पर्जन्याचें
येणें सुचवोनि मेघनादानें,
सुंदर वस्त्राच्छादित
वीज चकाके नभीं स्वरूपानें. १२
किंवा वसंतसमयीं
वनशोभा विलसते, जशी फार,
विहगगणाच्या योगें
सुचवी आनंद आपुला थोर. १३
तैशी राज्यश्री ती
वाद्यध्वनिनें समस्त पौरांस
लावी हर्ष कराया,
आशिर्वचनें तशींहि द्यायास. १४

दुःखाग्नीवरि हा नृप
सुखजल वर्षोनि त्यास नाशील,
ऐशी इच्छा सहजीं
होई पाहोनि भूपतीशील. १५
" त्याचे पूर्वज यांणीं
" चालविलें राज्य ज्या प्रभावानें,
" तैसेंच चालवो हा,"
म्हणुनी वदती प्रजा स्वभावानें. १६
" आयुष्य यास देवो
" शतवर्षें होउनी कृपार्द्र हरी,"
ऐसें कितीक बोलति,
अनुभवुनी कीं सुखाब्धिच्या लहरी. १७

[ शिखरिणी ].

पहा सारे शत्रू मग शमुनि जाती निजगृहीं,
तयाच्या राज्याचें हरण करणारे सकळही,
जणों शौर्याग्नीनें अखिल जळती शत्रुभवनें,
स्वतेजानें किंवा नृप रिपुतमातें हरुनि नें. १८

[ पृथ्वी ].

असा नृपति देखुनी बहुत हिंदुही हर्षती,
जसे मुसलमान ते स्वमनिंच्या मुदा दाविती,

रिघाव न मिळे जिथें नृप वसे स्वराज्यासनीं,
अगण्यसुखपूर्ण तो दिवस भासला या जनीं. १९

[ मंदाक्रांता ]

कोठें कोठें निजभवनिं हो लाविती लोक झेंडे,
कोठें नानाविधहि दिसलीं रम्य सौंदर्यतुंडें,
रस्ते तैसे विमळ करुनी गंधनीरादिकांनीं,
पौर प्रेमें श्रवण करिती गायनातें स्वकर्णीं. २०

[ शिखरिणी ]

स्त्रिया शृंगारांनीं सजति किति हर्षें, मग तयीं
दिसे सोन्याचीही विविध रचना या सुसमयीं,
करीं बाळें तेव्हां धरुनि पथि जाती सुवदना,
पुन्हां येती मागें बघुनि निजमार्गांत रमणा. २१

[ साक्या ].

नाच तमाशे जेथें तेथें होती मार्गीं तेव्हां,
मोरें जैशीं हर्षें नाचति जलद गर्जतो जेव्हां. २२
स्वाऱ्या निघती मार्गीं मार्गीं दाटी भारी होई,
अश्वावरती बसोनि कोणी नवल पहाया जाई. २३
हस्तीपृष्ठीं घालुनि कनकालंकृत अंबारी तीं,
बसती मध्यें घेउनि हर्षें पुष्पगुच्छ ते हातीं. २४
मधुरगायनामृत कर्णानीं पान करिति कोणी ते,
सुस्वर वाद्यें करीं घेउनी वाजविती तालातें. २५
पोपाखाच्या नादामाजीं डुलती कोणी जेव्हां,
भान न राहे मदांध सारे जन होती हो तेव्हां. २६

ऐशापरि बहु गडबड चाले पुरमार्गांतुनि लोकीं,
तेणें भासे सुखमय अवघें, देवपुरी नेणों कीं. २७

[ इंद्रवज्रा ].

केला जनांनीं अभिषेक त्याला,
सर्वत्र मोठा मग हर्ष झाला,
राजे परी अन्य न होति तुष्ट,
तेव्हांच शत्रू उठले सुपुष्ट. २८

तो चालवी अम्मल अन्यधामीं,
घे आपणालाच समस्त भूमी,
कोणा न थोडाहि जुमानि, तेणें
युद्धप्रसंगास पडेच जाणें. २९

[ पृथ्वी ].

पठाण रजपूत तों सकळ सैन्य घेवोनियां,
लढाउ जन अन्यही मिळति संगरीं यावया,
मनांत जळती, परी बहुत भीति ये तन्मनीं,
तथापि समरांगणीं त्वरित पातले त्या दिनीं. ३०

[ मालिनी ].

अकबर निजसेना घेउनी ये जयाला,
तिळ न हृदयिं खंती वाटली हो जयाला,
फिरवुनि मग शस्त्रा बोलला आपणातें,
'लवकर करितों मीं शत्रुच्या कंदनातें." ३१

[ आर्या ].

झाले दोनहि तट ते
करण्या युद्धप्रसंग या समयीं,
राहती उभे भुजाया
भूमिवरी सुप्रफुल्लदर्भमयीं. ३२

[ इंद्रवज्रा ].

नाना तऱ्हेचे दिसतात लोक,
शोभे तयांचाहि विचित्र झोंक,
कोणी शिपाई कपड्यांत दंग,
खड्गाकडे पाहत कोणि गुंग. ३३
अश्वांस नानाविध भूषवीती,
त्यांतें पहा झालर शोभवी ती,
मानेवरी केश वळोनि गेले,
वेणी पहातांच तुरंग डोले. ३४
घेवोनि हातांत महान भाले,
कोठें लढाऊ जनसंघ चाले,
पायांत तो पायजमा चढोनी
गेला, असे चालति वीर रानीं. ३५
शानींत नाचे बहु शिंगवाला,
फुंकोनि शिंगास तयार झाला,
अंगीं चढे लेप तया अपार,
तैसा असे देहिं बहूत जोर. ३६

[ शिखरिणी ].

निशाणें सूर्याच्या प्रखर किरणांनीं चमकती,
भरानें वायूच्या "फडफड" असा शब्द करिती,
जरीचे त्यामध्यें असति पटके सोज्वळ किती,
अनेकां रंगांनीं अतिशय मनोहारि दिसती. ३७

[ मालिनी ]

करि हि सकळ तेव्हां शोभती भूषणांनीं,
मढविति जयिं सांतें फार रंगादिकांनीं,
विविध रुचिर चित्रें काढिलीं सोंड तेणें,
स्मरिं गणपतीचें होइ साक्षात येणें. ३८

[ शालिनी ]

तंबू मोठे ठोकले जागजागीं,
राहोट्याही थाटल्या थोर मार्गीं,
डेरे देई यापरी सर्व सेना,
कोणाच्याही चित्तिं शांती वसेना. ३९
ठायीं ठायीं वाजते दुंदुभी ती,
जी ऐकोनी मानसीं येइ भीती,
ढोलाचा तो शब्द गंभीर थोर,
बोले, " येथें युद्ध होणार घोर !"४०

[ भुजगप्रयात ].

"हणाहो ! हणा !" शब्द ऐसा निघाला,
सुरू होइ तों शत्रुचा दुष्ट घाला,

कितीं मर्दुनी टाकिती वीर पायीं,
मरोनी किती शूर जाली अपायीं. ४१
रणीं धैर्य सोडी कितीकांस तेव्हां,
कडाका उठे मारण्याचाच जेव्हां,
कितीं भीतिनें जाति कोठें पळोनी,
किती आडमार्गीं महादाट रानीं. ४२
असे वीर सैन्यांत तो एक मोठा
स्वभावें, हुमायूनचा पुत्र, ताठा !
तुरंगावरी बैसुनी धांव घेई,
समस्तापुढें झुंज घेण्यास जाई. ४३
नदीचा जसा वेग होवोनी मोठा,
जमे एकजागीं जळाचा सुसाटा,
कड्याच्या वरोनी उडी धाड घे कां,
तसा हा लढाया निघे वीर बांका. ४४

[ शिखरिणी ].

पठाणांच्या पैकीं कवणहि धजेनाच सहसा
पुढें याच्या येण्या, बळकटी अहो ! तो नृप असा,
झुगारावा चेंडू गरगर हवेमाजिं, मग तो
फिरे जैसा, तैसा अकबर रणीं फार घुमतो. ४५
तदा तद्वीरश्री त्वरित अवघे जिंकुनि अरी
जयस्तंभा स्थापी, जय मिळवुनीं या अवसरीं,

प्रतापाचा डंका मिरवित निघाली स्वनगरीं,
जणों आनंदानें अकबर पती घेउनि करीं. ४६

[ साक्या ].

इकडे त्याचे शत्रू लाजुनि निजगृहिं निघोनि गेले,
वाइट वाटे त्यांच्या मनिं कीं यश भूपतिनें नेलें.४७
शस्त्रें हातीं घेउनि निंदिति तुच्छ मानुनी त्यांतें,
गोड न लागे कांहीं जेव्हां स्मरती पराजयातें. ४८
परस्परांला दोष लाविती, निंदिति परस्परांला,
"मुसल्मान हा मत्त होउनी बुडविल या राज्याला.४९
"कसे तुह्मी सगळे भेकड हो! शूर एकहि न आहे."
ऐसें बोलुनि संघ रिपूचा स्थानीं स्वस्थचि राहे. ५०
हेतु मनांतिल पूर्ण न होतां स्थिति जनिं व्हावी जैशी,
होई तेव्हां पठाण रजपुत यांचीही हो तैशी. ५१
धैर्य न उरलें वर करण्याला मान पुन्हा लज्जेनें,
"काय करावें? काय न किंवा?" न सुचे मुळींहि तेणें.५२

[ भुजंगप्रयात ]

स्थिती होत ऐशी निघाले घराला,
तयीं घालिती रानिं ते घोर घाला,
निराशेमुळें भीति पोटीं उरेना,
तसें त्यांस तें चित्तही सांवरेना. ५३
उडोनि त्वरें अश्व ते धांवतात,
नसे शुद्ध कांहीं तयांला वनांत,

" कुठें चाललों ? रान हें दाट कोण ?"
असें आणिना चित्तिं कोणी पठाण. ५४

[ इंद्रवज्रा ].

एकीकडे एक असे पळाले,
जेव्हां पराभूत बरेच झाले,
जाती घरीं शीघ्र उदास चित्तीं,
कोणी पळे जेविं मदान्ध हत्ती. ५५

[ भुजंगप्रयात ].

किती सुज्ञ होते तयांमाजि वीर,
घरीं जाति तेव्हां करोनी विचार,
" असो, काय चिंता ?" असें बोलतात,
स्वचित्तांत शांती बळें आणितात. ५६

[ आर्या ]

द्वेषी यापरि सारे
राजाचे होति नष्ट नृपतेजें,
शांति समाधान असें
लोकीं, पूर्वी न ठाउकें हो जें. ५७
गादीवरि बैसुनियां,
राजा दे लक्ष आपुलें सर्व
विद्येकडे तसें तें,
अन्य विषय शोधुनी धृतीपूर्व ५८

तारुण्यानें भरलें,
सुंदर त्याचें शरीर रमणीय,
योग्य विवाहासाठीं
त्याकाळीं यवनराज तो होय. ५९
शाखा तरुच्या होतां
मोठ्या विस्तीर्ण वल्लिच्या वीण,
दीन दिसे जैसा तो,
दिसला राया तसा वधूहीन. ६०
किंवा क्रीडा करितां,
स्त्रीविण पक्ष्यास चैन कोठून?
तैसें नृपास होई,
जाई त्याचें शरीर शोषून. ६१

[ स्वागता ].

काय कारण असेल कळेना,
चैन भूपहृदयास पडेना,
शब्दही बदलला असें दिसे,
स्पष्ट वर्ण फिरला मुखीं असे. ६२

[ मंदाक्राता ].

त्याचा मन्त्री सविनय ह्मणे, "ऐक राया! विनंती,
"जें त्वत्पादीं विदित करितों याविं तेणें न खंती,
"झालें आहे वय बहुत हें आपलें योग्य आतां,
"धन्या पत्नी त्वरकरि करी, सर्व पौरांस माता. ६३

[ शिखरिणी ]

''तुझ्या लावण्याला अधिक करि साहाय्य नवरी,
''अशी कन्या पाहीं, कधिंच अति सामान्य न वरीं,
''गुणांलाही सर्वां वितरि नवकांती अधिकशी,
''पदार्थाला जैशी रुचिर नकशी शोभवि तशी.'' ६४

[ साकी ]

यानंतर मग झालें त्याचें लग्न पहा थाटानें,
स्वगृहीं प्रेमें सुंदर नवरा स्वानुरूप ऐशी ने,
वय सोळावें जिला, सुवक बहु आकृति जीची होती,
स्वभाव मोठा लाख्या जीचा, विस्तृत नयनें हो तीं ६५
प्रीति पतीची पूर्ण तिच्यावर बसली कांहीं काळें,
परस्पराविण करमेनासें त्या दोघांसहि झालें. ६६
बागेमध्यें जाउनि केव्हां क्रीडा क्षण करिताती,
अन्य स्थानीं स्वपुरांतुनि तीं सौख्य मिळाया जाती. ६७
कधीं प्रजेच्या सुखदु:खांच्या गोष्टी सहजीं निघती,
काय जुलुम राज्यांत असे तो शोधाया बहु झटती, ६८
भासति लोकां मातापितरें तारुण्यामधिं काय !
ज्यांच्या योगें क्लेश नष्ट हो, दूर विपत्ती जाय. ६९
यापरि अनुभव घेतां घेतां पूर्ण सुखाचा नित्य,
बरेच गेले दिवस तयांचे, परि वाटेना सत्य. ७०

[ वसंततिलका ].

गर्भार राहिलि तदा प्रिय पट्टराणी,
कांती जिची प्रतिदिनीं प्रकटे फिरोनी,
पाहोनि हें अधिक हर्ष नृपास होई,
देखावया प्रियसखी नृप नित्य जाई. ७१

[ पृथ्वी ].

"प्रसूतसमयीं हिचे बहुत हाल होतील कीं,"
ह्मणोनि उपचारिं तो कधिं न होउं देई चुकी,
स्वयें सकळ वासना पुरवितां खपे राय तो,
अशापरि पहा तिला नवम मासही लागतो. ७२

[ इंद्रवज्रा ].

व्हावा मला आत्मज, कामना ही
चित्तीं धरी तो दृढ, अन्य नाहीं,
विश्वेश्वरेच्छा परि भिन्न होती,
कोठून हो पूर्ण सुवासना ती. ७३

[ भुजंगप्रयात ].

मुसल्मान जोशी तदा प्राप्त झाले,
तयांनीं यथाशक्तिही यत्न केले,
"इला पुत्र होईल का?" प्रश्न येतां,
तयानीं अशी लेखिली गोड वार्ता. ७४

[ शार्दूलविक्रीडित ]

"राजा! पुत्र न होय याच समयीं, तत्रापि धैर्या धरीं,
"ह्लीं पोटिं तुझ्या सुदैव तनुजा आली असे सुंदरी,

''हीचे हे ग्रह सर्व फार असती युक्त प्रभो ! सौख्यद,
''जीच्यापासुनि मानवर्धन तुझें, संतानशांतिप्रद.''

[ भुजगप्रयात ].

जरी वाटलें दुःख थोडें नृपाला,
तरी ऐकुनी शब्द हे हर्ष झाला.
समाधान जो मानसी नित्य ठेवी,
तया श्रीहरी सर्वदा सौख्य दावी. ७६

[ वसंततिलका ]

झाली प्रसूत मग ती रमणी तयाची,
कन्या जिला प्रथम होइ सुरूप साची,
देखावया त्वरित ये नरपाल राणी.
जोशीहि सर्व वदती, ''खरि होय वाणी!'' ७७

दुसरा भाग समाप्त.

## भाग ३.

[ शार्दूलविक्रीडित ]

प्राणी आपण सर्व एक विभुचे, जो मायबापापरी,
उत्पत्ति स्थिति नाश नित्य करुनी ब्रह्मांड हें उद्धरी,
ऐसें जाणुनि जातिभेद न बघे, सर्वांसवें सारखा
जो वागे जगतांत मानव सदा, त्या ईश देवो सुखा. १

[ आर्या ]

ब्राह्मण तैशा इतर
ज्ञातीच्या ठेवि कारभाऱ्यांस,
हुद्दे देउनि मोठे,
दावी निष्पक्षपात साऱ्यांस. २
देउनि वस्त्रें कोणा,
प्रधानकीचीं कृपाळु नरपाळ,
सोन्याचा जणु आहे,
यापरि भासवि जनास तो काळ. ३
नेमी विश्वासानें,
कोणी हिंदू कृती खजिनदार,
देखुनि निपुण तयाला,
द्रव्यानें तोषवीतसे फार. ४
जातीचा यवन जरी,
ब्राह्मण तरि आवडे मनीं त्यास,

वैश्यादिकींहि होती
ज्याची दृष्टी दयार्द्र ती खास. ५
राजाला भेटाया
कोणी गेल्यास नोव्हती बंदी,
जातां विद्वज्जन, या
सत्कारुनि पूर्ण आदरें वंदी. ६
जों जों उदय तयाचा
होई, तों तों विनम्र अधिक गमे.
ज्याच्या नेत्रीं पडला
राय, तयाचें मन प्रभूत रमे. ७
राज्याचा अधिकारी
सुशील, हें हो नसे नवल काय?
यद्यपि अल्प श्री तरि,
लोकीं गर्वें भरोनि जन जाय. ८
दुष्टाचें शासन वा
सुष्टांचें अवन[1], दोनि हे धर्म,
राजे थोडे किति परि,
करिती सर्वत्र आपुलें कर्म. ९
दुर्जन सौख्या पावति,
सज्जन छळ भोगिती अशी रीती,

---

१ रक्षण.

सांप्रतची बहुधा जी,
त्यांमधिं राजे कधीं न ते चुकती. १०
पण रत्नें सांपडती,
सर्व ठिकाणीं असें जगीं नाहीं;
मग नीतिचे राजे,
प्रेक्षक जन सर्वदा कसे पाही? ११
संस्कृत भाषा ज्याच्या,
दरबारीं विलसली, असा नृपती
यवनांमध्यें अकबर;
विद्या जेथें प्रभाव दाखविती. १२

[ स्रग्धरा ].

पाहोनी हिंदुशास्त्रें नवल बहु तया जाहलें हो ह्मणोनीं
बोलावी पंडितांतें चतुर निजसभेमाजि विद्यादिकांनीं;
सत्कारोनी तयांतें श्रवणकरि सदा वाद अन्योन्य त्यांचा
धर्मज्ञानार्थ यत्नें सतत करितसे स्नेह विद्वज्जनांचा. १३

[ भुजंगप्रयात ].

जगन्नाथराया ह्मणोनी सभेंत,
असे एक विद्वान् दुजा पंडितांत,
जयाला असे चार शास्त्रीं गती हो,
जया सारिखा अन्य वेत्ता न तो हो. १४

[ द्रुतविलंबित ]

अति लहान असे वय तेधवां
नृपतिच्या दरबारिं असे नवा,
प्रथम कीर्ति न झालि बहूतशी,
पसरली तदनंतर ती जशी. १५

[ आर्या ]

जन्म तयाचा झाला,
जरि हो अतिदीनशा कुळामाजी,
वर्णनयोग्य असे तरि
दाखविली दक्षता तयानें जी. १६
केले त्याणें सारे,
वक्तृत्वें भूप विप्र संतुष्ट,
ऐसा वक्ता मोठा,
ज्याचें पांडित्यही असे स्पष्ट. १७
आकर्षुनि मन टाकी,
रूप तयाचें असे मनोहर तें,
जैसें सुंदर अबला-
वदनकमल नरहृदास हो हरतें. १८
तारुण्यास विशेषें
विद्या शोभवि, तशीच आकृतिस
ज्याच्या योगानें, त्या
भुलला तो मुसलमानही कृतिस. १९

[ शुद्धकामदा ].

" कोण देशिचा असशि तूं नरा !
" सांग सत्वरें मजशिं सुंदरा! "
प्रश्न यापरी करि जयीं धनी,
बोलला तया राय तत्क्षणीं. २०

[ आर्या ].

" जातीनें मी ब्राह्मण
" आहें हें जाण तूं मनीं राया !
" तुजजवळी येती जन,
" अखिल भवोत्पन्न दुःख वाराया. २१

[ साक्या ].

"सब लोगोंका आश्रय तुमही अल्ला आगे जैसा,
"कौन तुमारेबिन ये मेरे दुःख करे जी फैस्सा ? २२
"कौन नाथजी किंवा सूरजबिन निकलेंगे छाया,
"तैसी व्याधी मेरे दुर कर ये विनती है राया! २३
"गुरूपास हम विद्या सुनकर पास तुमारे आया,
"कृपा तुमारी जभी होय तो सब कुच हमने पाया.२४

[ पृथ्वी ]

"समीप म्हणुनी तुझ्या लवकरीं पहा येतसें,
"तुझें मनहि सत्वरें सकरुण प्रभो! हो तसें,
"नृपाश्रय करावया बहुत हेतु होता मनीं,
"तुझ्यासम मिळो मला तरि हरिकृपेनें धनी. २५

[ आर्या ]

"राजानें वियेला
"यावा बहुमान, हें असे उचित,
"पंडित यास्तव या तव
" दरबारीं प्राप्त होति वा सतत. २६

[ भुजगप्रयात ]

"तुझ्यासारखा नीतिचा अन्य राया !
"नसे देशिं या, गोष्ट ही नाहिं वाया,
"प्रजापालनीं योग्य तूं मात्र होशी,
"दुजे भूपती गांजिती स्वप्रजेशीं. २७
" मुसल्मान कोठें असा कोण अन्य ?
" अहा राय! तूं सर्वथा फार धन्य!
" जरी म्लेंछहिंदूंमधें वैर आहे
" तरी त्वत्प्रसंगें मुळीं तें न राहे. २८
" असा काळ येईलसें वाटलेंना!
" कधींही कधीं ही॰इजा टाळवेना;
" असें बोलती लोक पूर्वीच सारे,
" परी देशि तूं सौख्य लोकांस या रे." २९

[ पृथ्वी ].

जयीं श्रवण तो करी वचन पंडिताचें खरें,
प्रफुल्ल हृदयीं घडे यवन हांसला निर्भरें;

तयास नृप देउनी विपुल वित्त संतोषवी,
प्रसन्न मन आपलें मग तयावरी दाखवी. ३०

[ शुभ्रकामदा ]

पंडितांमधीं वाद होइ तो,
ऐकुनी समाधान पावतो,
भूप त्या सभेमाजि जाउनी,
सादरें बसे तुष्ट होउनी. ३१

[ भुजगप्रयात ].

जगन्नाथरायास हो गर्व मोठा,
" असें थोर मी, " हा असे फार ताठा,
न विद्वज्जनीं वांकवी मान राय,
अशी आढ्यता मानसीं ज्यासि होय. ३२

[ शिखरिणी ].

तयाची विद्वत्ता प्रबळ बहु होती खरि जरी,
निरर्था गर्वे त्याचें बहुत न पडे तेजच तरी,
जणों या डागानें गुण सकळ वाटे अवगुण,
स्वभावें विद्या ती परि जनिं करी स्वप्रसरण. ३३

[ भुजंगप्रयात ]

सदा तुच्छ मानी दुजां पंडितांतें,
न इच्छी मुळीं मान देण्यास त्यांतें,
सदा स्पर्धिती एकमेकांस फार,
खुलें यापरी होई वादास द्वार. ३४

[ शालिनी ].

त्याला वाटे होइ माझी अवज्ञा.
केली त्यानें फार मोठी प्रतिज्ञा.
"जिंकोनी मी सत्वरें लोक सर्व,
"पांडित्यानें हारितों थोर गर्व." ३५

[ आर्या ]

दरबारीं राजाच्या,
इतर ठिकाणीं तशी मिळे कीर्ती,
ह्मणुनी "पंडित" ऐशी,
अभिधा देती तयास सर्व कृती. ३६
संस्कृत भाषा मधुरा,
आवडली त्या रसाळ नृपतीतें,
यास्तव आश्रय अपुला,
वृद्धी व्हावी ह्मणोनि दे तीतें. ३७

[ शिखरिणी ]

कुराणाचें भाषांतर करवि गीर्वाणित यदां,
महायत्नें रात्रंदिन झटति ते पंडित तदां,
स्वधर्माचे ग्रंथ प्रथम फिरवी संस्कृतगिरीं[२]
स्वभाषेमध्यें ही मग इतर भाषेंतुनि करी. ३८

---

१ शहाणे लोक. २ संस्कृत भाषेंत.

[ आर्या ]

धर्माविषयीं होई वादविवाद प्रवीण लोकांशीं,
ज्ञानेच्छेनें अकबर ठेवी सुस्नेह अन्य राजांशीं. ३९
लोकांचे जे असती भिन्न असे धर्म, ते पहायाला
होती उत्कंठा मनिं दृढतर नित्य स्वभावतां त्याला ४०

[ द्रुतविलंबित ]

यवन हिंदु तसे इतर श्रमे
सकळ धर्म विलोकुनि तो रमे,
अकबरास मनीं जरि नावडे
कवणही, तरि पाहि तयांकडे. ४१

[ आर्या ]

ख्रिस्तीधर्माविषयीं
होई त्या विदित वर्तमान जसें,
नूतन हा देखावा
पंथ अशी कामना हृदांत वसे. ४२
" या पंथांतिल असती
" अनुयायी कोणत्या प्रकाराचे
" किंवा विचित्र आहे
" चरित तयांच्याच धर्मकाराचें ! ४३
" भाषा अथवा त्यांची
" नाहीं ठावी असेल ती कैशी !

" पोषाखाची किंवा
" रीति असे काय आमुची जैशी !" ४४
या परि तर्क मनीं तो,
बादशहा करि अनेक काढून,
सर्व प्रधानमंडळ,
झालें हर्षित तयास पाहून. ४५
मोठी हौस असे कीं,
आणुन गोऱ्यांस[1] मौज देखावी,
भाषण ऐकुनि त्यांचें,
क्षणभर ती करमणूक मानावी. ४६
याकरितां पाठविले
गोंव्याप्रति[2] दूत आपले त्वरित,
अभयवचन देवोनी,
आदरपूर्वक तयांस विनवीत. ४७
" लौकर यावें आपण,
" यासाठीं सर्व सोय केलि असे ;
" उत्कंठा मज मोठी
" भेटीची; धीर सेवकास नसे." ४८
ख्रीस्तीमतोपदेशी,
येती मग पोर्तुगाल देशींचे,

---

१ युरोपातील लोक २ पोर्तुगीज लोकांच्या अमलाखालचा

बादशहानें स्वागत,
केलें त्यांचें सहर्ष तें साचें. ४९
फत्तेपुरास होती
राजाची वसति या सुसमयास,
तेथें मोठ्या थाटें
स्वारांनीं आणिलें तदा त्यांस. ५०
त्या ख्रिस्ती लोकांनीं
दिधले सन्मानपूर्व नजराणे,
स्वीकारी नृप त्यांतें,
मानुनि आभार फार हर्षानें. ५१
देती स्वधर्मपुस्तक
बैबल नामक तयास वाचाया,
यवनी भाषेमध्यें
भाषांतर करविलें असे द्याया. ५२
या चिन्हांनीं जाणिति,
"कीं स्वीकारील धर्म हा आपुला."
आशा उद्भवली बहु,
भंग तिचा तत्क्षणीं परी झाला. ५३
बोलावी वरचेवर,
दरबारीं पाद्र्यांस तो राय,
तेही सोत्सुक येती,
परि त्यांचा यत्न फुकट हो जाय. ५४

[ साक्या ]

" तुमचा धर्म मला आवडतो," ऐसें बोले राजा,
परी न देई खास मनांतुनि साह्य तयांच्या काजा. ५५
अंतीं कोणी दरबारांतिल राव तयांला बोले,
" व्यर्थ असे तुमची ही आशा, कांहिं न येथें चाले. ५६
" तुह्मांस पाहुनि वाटे मोठी मौज नृपाला तेणें,
"ह्मणुनी बोले तुमच्यांशीं हा राजा मधुर वचनें. ५७
" जावें स्वस्थानाप्रति तुह्मी, व्यर्थ धरावि न आस,
" अन्य मतांतें ऐकुनि घ्याया आहे याला हौस. ५८
" केलें आहे गूढ निवेदन तुह्मांला मीं सर्व,
"तरि राजाला वश करण्याचा सोडुन द्यावा गर्व. ५९

[ आर्या ]

इतक्यामध्यें कोणी
यवनांचा धर्मकर्मउपदेशी,
आला दरबारीं स्या,
बोले वचनें मनोज्ञ रायाशीं. ६०
" धर्म खराहो अमुचा,
" हें करण्या सिद्ध मी असें राजी,
" घेउनि कुराण हातीं,
" टाकितसें अग्निमाजि तनु माझी. ६१

" जरि मी पावें मरणा,
" तरि खोटा धर्म यांवनी आहे,
" या ख्रिस्ती लोकांनीं,
" दावावी करुनि गोष्ट मोठी हे. ६२

[ शिखरिणी ].

प्रतिज्ञा तेव्हां तो यवन करुनी सिद्ध बनला,
न ख्रिस्ती धर्माला सहज मग थाराच उरला,
निराशा होतां ते स्वगृहगमनीं बेत करिती,
नृपाज्ञेनें पाद्री सकळ निजदेशास पळती. ६३

१ मुसलमानांचा.

# भाग १.

[ मंदाक्रांता ]

प्रातःकाळीं उपवनिं दिसे रम्य शोभा तरूंची,
चारी तेव्हां उमलुनि दिशा कांति भासे रवीची,
पानें सारीं चमकति किती रात्रिच्या या दंवानें,
मोत्यें नेणों पसरुनि दिलीं सृष्टिच्या नायकानें ! १

[ शिखरिणी ]

जलाच्या बिंदूंची रचिलि जणुं माला बहुमुदें,
जगाच्या कर्त्याची कृति अखिल जीवांस सुख दे !
चिदानंदाच्या त्या बघुनि हिरवे पादप कुपे,
जणों आनंदानें धरणिवर ते गाळिति टिपें ! २
सकाळीं कारंजीं उडत असतां शीतळ हवा !
तशीं पुष्पें होती विकसित, सुगंधें झुलति वा,
तयांचीं ज्या काळीं विलसति पहा हास्यवदनें,
जनाच्या चित्ताला रमविति अनेकाख्य सुमनें. ३
फुलें वेंचायाला जमति मिळुनी कांहिं अबला,
तयांचीं वारा तो उडवि लुगडीं दाउनि कला,
जणों झोंबे अंगा तरि हि न निवारी जन तया,
झटे कीं देखाया अवयवच ते ! सोडुनि भया. ४

[ इंद्रवज्रा ].

माळी सुमाला करण्यास वेंची,
पुष्पें भुईच्या वरलींच साचीं,
किंवा करानें फलगुच्छ तोडी,
ज्याची दुजा वस्तुस ये न तोडी. ५

[ प्रहर्षिणी ].

"झाडांनीं मधुरफळें बळें धरावीं,
"भारानें नमुनि उपासना करावी,"
ऐसे ते विहग तदा तरूवरोनी,
गुंजारें करिति सकाळ कीं स्मरोनी. ६
आंब्याचे तरुगण फुल्ल फार झाले,
मोहोरा रसमय पाहि, पक्षि डोले;
त्यांमध्यें स्वर मग गोड कोकिळांचा,
होई तो श्रवण करोनि हर्ष साचा. ७

[ वसंततिलका ].

एके दिनीं उपवनीं रमणीयकाळीं,
तो राय पंडित निघे कुतुकें सकाळीं,
तेथें समोर सहसा मग पाहि कन्या,
जी रूपमूर्ति विधिनें घडलीच धन्या. ८

[ द्रुतविलंबित ].

मन तदीय हरोनि कुमारि ती,
सुतनु मोहित त्यास करी किती !

जणुं दुजी रति वाटलि पंडिता,
जयिं तया निज दर्शवि चारुता. ९

कुसुमकोमल देह जिचा असे,
करिं जिचा कुसुमां निवडीतसे,
पदर सांवरुनी वरचेवरी,
सुतनु लज्जित होइ परोपरी. १०

धरुनि पुष्प करीं पद टाकिते,
निजविलास मनोहर दावि ते,
रुचिरता वदनावरि भासली,
चतुरताहि निच्यामधिं दीसली. ११

[ इंद्रवज्रा ].

जाग्यावरी राहि उभाच राया,
त्याला नुरे भान पुढें चलाया,
पाहोनि तीतें मन होइ दंग,
झाली तदीया मति फार गुंग १२

[ शिखरिणी ].

कटाक्षानें त्यातें जणुं सुललना घाव करितां
तयाच्या चित्ताला मृदु करुनि दावी चतुरता,
स्वसामर्थ्यानें कीं हरण करि त्याचें मन तदा,
तयाला त्या स्थानीं भिडुनि जणुं टाकी दृढ सदा. १

[ पृथ्वी ].

" असेल वनदेवता उपवनास राखावया !
" कदाचित सुरांगना भुवन येइ देखावया !
" उगीच अथवा मला मनिंच भास हा होतसे !
" न कांहिं अनुमान तें समयिं या मला हो तसें. १४
" दिसे वयहि कोंवळे अजुनि लग्न झालें नसे,
" हिच्या सहज नेसणावरुनि वाटलें हें असें,
" असंशय हिला करी मदनबाण फार व्यथा,
" मनोहर तरी कसें वदन खिन्न जें सर्वथा. १५

[ आर्या ].

" यवनाची कन्या ही,
" वस्त्रांवरुनी दिसेच निश्चय हा,
" विनय हिच्या तनुला तरि,
" शोभा देई किती विचित्र अहा !" १६

[ भुजंगप्रयात ]

असे आपणाशीं वदे, जाय तों ती,
नसे चैन तेव्हां गमे फार खंती,
कुठें चित्त याचें रमेना मुळींही,
परी कामबाणांस दु:खार्त साही. १७

[ आर्या ]

" कोण असे ही ?" ह्मणुनी,
पुसतां ते लोक उत्तरा देती,

" कन्या बादशहाची,
" रूपवती देखिली तुह्मीं जी ती. १८
" योग्य वरा शोधितसे
" अकबर दुहितेस, फार दिन झाले,
" परि न मिळे योग्य पती,
" जरि राजे विविध सर्व धुंडियले." १९

[ शिखरिणी ]

ह्मणे राया तेव्हां स्वमनिं धरुनी हेतु बहुत,
" मला विश्वेशाच्या सकळ मनिंचा भाव दिसत,
" कळों येई मातें मजविण दुजा ही न नवरी
" धरीं आशा भारी अकबरसुता मी तरि वरीं." २०

[ वसंततिलका ]

गेले असे दिवस यापरि फार जेव्हां,
एकेदिनींसहज तो नृप येइ तेव्हां,
होऊनि पंडित विनम्र तयास बोले
चातुर्ययुक्तवचनें, मन हृष्ट झालें. २१

[ भुजंगप्रयात ]

"अहा काय राजा! तुला सांगु गोष्ट!
" महा कौतुकें ऐकुनी होइं तुष्ट;
" वनीं पाहिलें फूल एक्या सरांत,
" जयाची भरे कांति माझ्या मनांत. २२

[ द्रुतविलंबित ]

" कमळ तें जरि सुंदर वाटलें,
" न शशिमंडळ त्यास्थळिं भासलें,
" ह्मणुनि पूर्ण विकास न हो तयीं
" इतर सर्व सुरम्य असे जया. २३

[ वसततिलका ].

" होई शशी उदित सोज्वल सुप्रसन्न,
" तेव्हां दिसे कमळ तें न मुळींच खिन्न,
" पाहोनि त्या प्रियकरा मग हो प्रफुल्ल,
" होई प्रभातसमयीं जणुं सूर्यफूल. २४

[ मालिनी ]

" लवकर परि दोन्ही पाहुनी एकमेकां,
" अति विरसचि होतीं सांगवे तें न हें कां ?
" रजनिकर तयाला पाहुनी होइ दीन,
" कमळहि शशिवक्त्रा देखतां होय हीन. २५

[ भुजगप्रयात ].

" असा कांहिं जो लोटला वेळ तों तें,
" जळीं घेइ त्या सत्वरें वा उडीतें,
" प्रियस्नेहि झाला दिसेना असें तो
" तयीं पाहुनी चंद्र अस्तास जातो. २६

[ शुद्धकामदा ].

" नवल देखिलें मीं नृपा असें,
" तें तुला स्वयें वर्णिलें असे,

"यांत अर्थ जो वाटतो तुला,
"तो कृपाकरा! सांग वा मला." २७

[ साक्या ].

गुंग तदा मति होइ तयाची काय असें नकळे तें,
"विस्मय कीं तुज इतका भासे" बोले पंडित त्यातें, २८
"येइ न कां मम हेतु तुझ्या या मानसिं राजा! बोल
"मुळींच नाहीं विचार मी जो सांगितला तो खोल." २९

[ भुजगप्रयात ].

जगन्नाथराया तया हेतु सांगे,
मनामाजिं राहील इच्छा तरंगें,
"तुझी सुंदरी यावि हो तूं मला ती
"तरी सर्व दुःखें मनांतून जाती. ३०
"जरी ब्रह्मजातींतला जन्म माझा,
"मुसल्मान धर्म प्रभो! होय तूझा,
"तरी ईश्वरा सर्व आहेत एक,
"तयाचे पहा जीव सारेहि लोक." ३१
तसा राय तो बोलला मोंगलांचा,
जयाची असे सर्वदा गोड वाचा,
"मुसल्मान तूं होशि सोडून जात,
"तरी कन्यकेला द्विजा! होशि कांत. ३२
"तुझा धर्म हिंदू जरी राखिशी तूं,
"तरी पूर्ण होणार हा नाहिं हेतू,

" किती लाज वाटेल माझ्या सुतेला
" कराया पती सांग रे ! ब्राह्मणाला." २३

" सोडोनि देईल हें वेड सारें,
" याच्या मनांतील जाईल वारें,
" हा बेत होईल याला न मान्य,"
मानी असें तो महीपाळ धन्य. २४

[ द्रुतविलंबित ]

परि न आग्रह सोडिच आपुला,
"फिरुनि बोलतसे निजस्वामिला,
"कळविलें तुज वृत्त यथार्थ तें,
"करि अनुग्रह हे सदया पते !" २५

नवल काय तदा घडलें पहा,
घडवि ईश्वर चित्रकृती. अहा !
त्वरित पंडित होइ विवाहित,
अहित मानुनि राहि सुखें हित. २६

[ शालिनी ].

झाला जेव्हां जांवई यावनाचा,
होई हेतू पूर्ण त्या ब्राह्मणाचा,
लग्नाचे जो सोहळे सर्व भोगी,
थोडया काळें राय झाला अभागी. २७

[ मालिनी ]

गडबड नगरीं ती ऐकुनी विप्रजाती,
वरि यवनकुमारी सोडुनी ब्रह्मजाती;
ग्रहण करित भार्या तो जगन्नाथ आहे,
नवल बहुत त्यांना वाटलें पाहतां हें. ३८
ह्मणति "बुडविलें हो पंडितानें स्वधर्मा,
"हर! हर! परलोकीं भोगिशी तूं स्वकर्मा,
"असुलभ जननीच्या येउनी जन्म पोटीं,
"कशितरि! अविचारें गोष्ट ही केलि खोटी." ३९

[ आर्या ]

राजाच्या गृहिं येउनि
ब्राह्मण निंदिति अशापरी त्यास,
होई अशी अवस्था,
लोकविरुद्धप्रमादकर्त्यास. ४०
गांजिति लोक तयाला,
दूषण देवोनि कष्टवीती ते,
तैसे बहुविध छळितां,
जीनें वरिलें द्विजास त्या सतितें. ४१
नाहीं निश्चय ढळला,
परि त्या सत्यानुरक्तरायाचा,
सोशी तो छळ अवघा,
दृढ होता नेम यापरी ज्याचा. ४२

"स्तुति निंदा मानिति सम,
"धरि सदां न्याय्य मार्ग सोडिति न,"
भर्तृहरीचें वाग्,
मनिं त्याच्या सज्जनांस हें वच्न. ४३

[ वसंततिलका ]

"हा भ्रष्ट ! हा अधम! पापि! तसा विनष्ट,
"स्पष्टार्थ हा, बहुत होतिल याम कष्ट,
"होवोनि पुष्ट बनला अतिमत्त खष्ट,
"सोशील हाल नरकीं करि काळ पिष्ट. ४४
"याला गती परजगीं न मिळेल सत्य
"लोळेल दुःखनिकरीं विविधा अगत्य,
"हें घोर कर्म अति निंद्यच आचरीलें,
"शिक्षा यमाघरिं घडेल, न कांहिं चाले." ४५

[ भुजंगप्रयात ].

पुन्हा कावळ्यासारिखे लोक जेव्हां,
दयाहीन ते गांजिती त्यास, तेव्हां
करी राय गंगानदीप्रार्थनेला,
जिच्यामाजि उद्धारहेतूच ठेला. ४६

[ इंद्रवज्रा ].

गंगातिरीं जाउनि बैसला तो,
पत्नी सवें घेउनि राय जातो,
घांटावरी जी रमणीय भासे,
शोभा, तयें हो मन दंग खासे. ४७

[ पृथ्वी ].

सहास मग आळवी धरुनि भक्तिला मानसें,
विनम्र अति होउनी करयुगास जोडीतसे,
अगाध महिमा तिचा हृदयिं आणुनी सादरें,
करी विविध वर्णन, प्रबल पाप तेणें सरे. ४८

[ इंद्रवज्रा ]

भार्या तयाचीहि करांस जोडी,
प्रेमाश्रु नेत्रांतुनि फार सोडी,
पतिव्रतेचा सतत स्वधर्म,
जेणें प्रियाच्या अनुसार कर्म. ४९

[ आर्या ]

पतिला अपुल्यासाठीं
होती इतुके महान कष्ट, असें
पाहुनि दुःख तिलाही
होइल अनिवार या क्षणीं न कसें? ५०
भर्त्याच्या सन्निध ती,
बैसुनि झाली कृतार्थ सुभग सती,
जें घडणार तयाची,
वाट पहाया करी तयार मती. ५१

## गंगाप्रार्थना.

[ शिखरिणी ].

"तुझी लीला गाती जन सकळ माते! सतत हे,
"मनुष्यांचीं पापें अखिल जळतीं त्वत्सुनिवहें,

"पहा! ज्या ज्या वृक्षा जननि! तव तीराश्रय मिळे,
"तयाला तूं देशी जल पुरवुनी पुष्प सुफलें. ५२

[ पृथ्वी ].

"रवी किरण पाडुनि तुजमधीं जणूं नाचतो,
"दिनान्त घडतां शशी उगवुनी तुला वंदितो,
"प्रवाह तव वाहतो सुभग शांत गंभीरसा,
"मनास बहु देइ तो विमल हर्ष माते! कसा ! ५३

[ हरिणी ].

"रमणिय अहा! जन्तू अम्बे! तुझ्या उदरीं किती,
"सुखमय सदा त्यांच्या क्रीडा मनोहर भासती,
"मकर वसती नीरामध्यें भयंकर फारसे,
"तरिहि सुभगे! शोभे मूर्त्ति त्वदीय कृपारसें. ५४

[ मालिनी ]

"जननि! तुजविणें या पामरा अन्य कोण?
"ग्रहण करिल सांगें देउनी वारिपान,
"करिशि अवन त्यांचें थोर पापी असे जे,
"तरि वद! मग ओझें घेशि तूं कां न माझें? ५५

[ मंदाक्रांता ]

"उद्धारीं गे त्वरित मजला होउनी आर्द्र आतां,
"जावो माझी सकळ मनिची त्वत्कृपेनें अहंता,
"पापें सारीं दहन करुनी मुक्त मातें करावें,
"या दीनातें सदय जननी! स्वोदरीं त्वां धरावें. ५६

[ हरिणी ].

"भगवति! तुला येवो माझी तरी करुणा पहा!
"तळमळतसे दु:खामध्यें अभाग्यच दीन हा,
"तरति जगतें नांवानेंही तुझ्या, जगदाश्रये!
"जननि मजला नेण्यासाठीं कृपा कर शीघ्र ये. ५७

[ आर्या ]

"केली मी यवनाची
"दुहिता भार्या मदीय हे, आई!
"यास्तव माझा अम्बे!
"छळ या लोकांत फारसा होई. ५८
"ब्राह्मण गांजुनि मजला,
"लाविति दुर्वार दोष दीनातें,
"बोलति कैसें केलें
"यानें यवनीसवें स्वयें नातें. ५९
"तरि यावेळीं माते!
"कोण तुझ्यावीण सोडवी मातें?
"केलें या कर्मातें,
"शुद्ध करीं पुरवुनी स्वकामातें. ६०
"यवनाच्या जामातें
"बुडवुनि स्यां तातसुष्टनामातें,
"धर्मातें पुत्राच्या
"रक्षियलें नाहिं वरुनि वामा ते. ६१

"वर्णूं किति तरि भक्ति-
"प्रिय गाती लोकगे तुझी ख्याती,
"गति देशी तूं त्यांशीं,
"नतिच्या[1] कृतिनें जरी शरण येती-" ६२
या परि भाकी करुणा,
आली गंगेस तत्क्षणींच दया,
एकैका श्लोकाप्रति,
चढली एकैक पायरी न्याया[2]. ६३
ऐशापरि तीचें जल
चढतां चढतां बरेंच चढलें तें,
इतुक्यांत एक सुंदर
हस्तकमल त्या जलावरी दिसतें. ६४
त्या वेळीं या दोघां
आली स्वर्गीय कांति हो खचित
दिव्यकराच्या योगें,
दिव्य तयांचें हि तेज हें उचित. ६५
झाली गंगा प्राप्त
प्रेमें तेथें वधोनि हें रायें,
त्याच्या ही मानसिं बहु
ममतेचा लोट वाहुनी कीं ये. ६६

---

१ नमस्कारपूर्वक किंवा नम्रपणानें
२ जगन्नाथराय पंडितास नेण्यासाठीं

[ इंद्रवज्रा ].

जेथें स्त्रियेच्या सह बैसला तो
तेथें जळाचा मग लोट येतो,
घेवोनि पूजा कुसुमें करांनीं
गंगेस वाही द्विज साभिमानी. ६७

[ द्रुतविलंबित ].

द्रुय अदृष्ट तदा नदिच्या जळीं
त्वकरी मग होय सुनिर्मळीं,
परतलें शिवतां न दुजा जिवा
समजुनी जणुं पातकि तेधवां. ६८

[ वसंततिलका ].

पाहूनि हें नवल वाटतसे जनाला
जे निंदिती प्रथम त्यांसहि हर्ष झाला,
बोटें मुखीं सकळ घालुनि शांत होती
लज्जावशें न मुखिं अक्षर काढिताती. ६९

[ भुजंगप्रयात ].

" अहा, पंडिता ! धन्य तूं, धन्य राया ! "
असें बोलती कोणि साधू नरा या,
" तुझी सत्यता धन्यरे, धन्य आहे ! "
असें बोलतां भान कोणा न राहे. ७०
" जरी कन्यका यावनी त्वत्प्रिया ही
" पतीच्या वरी पूर्ण निष्ठाच राही,

" खरा लाविला आज झेंडा जगांत
" खरें प्रेम दृष्टीस आलें जनांत. ७१
" तुझ्यासारखा सौख्य भोगी न अन्य,
" तुझ्यासारखा रे नसे कोणी धन्य.
" अहा ! सत्य जाशील तूं देवलोकीं,
" तुझा लोभ आम्हांवरी ठेव बाकी. ७२
" तुला व्यर्थ रे ! गांजिलें या जनांनीं,
" अम्ही नीच सारे, घडे पुण्यहानी.
" स्वयें दुष्ट, अन्यास दे दूषणें तो,
" असा नेम या मृत्युलोकीं पहातों. " ७३

[ आर्या ].

झाली उदास तेव्हां
गंगातीरावरील जागा ती,
रायाची स्वर्गीं परि
देवांचे दूत किर्ति ती गाती. ७४

[ शार्दूलविक्रीडित ].

झालें दु ख बरेंच त्या नृपतिला कन्येमुळें मानसीं,
होती आवडती सुरूप दुहिता गेली स्वभर्त्यानिसी,
तत्रापी सुखरूप अन्य जगतीं आहे असें वाटलें,
गंगेनें उदरीं स्वयें धरुनियां नेलें तिला हें भलें. ७५

भाग चवथा समाप्त.

## भाग ५.

[ आर्या ]

मोगल सरदारांनीं
गुजराथेमाजि बंड जें केलें,
वेढा घालिति अमदा-
बादेला मत्त फारसे झाले. १
दोन सहस्र सुयोद्धे
आग्र्याहुनि पाठवी त्वरें आधीं
मागाहुन आपणही
अकबर जाई न टाळितां संधी. २
चाळीस कोस त्यानें
मारावी मजल रोज कष्टानें,
संग्रामाच्या जागीं
आठ दिशीं सैन्य सर्व ही तो ने. ३
शत्रूच्या हेरांनीं
सांगितलें वृत्त हें धन्यालागीं,
सेना कांहीं होती निजलेली
कांहिं होति तों जागी. ४
श्रवण करुनि हें भासे
मोठें आश्चर्य बंडवाल्यांस,

दैविक शक्ती आहे
ऐसा तेव्हां तयांस हो भास. ५

पळ घेती मग कोणी
अकबरसेना तयांस आडवि तों,[1]
युद्ध कराया राजा
मोगल लोकांस जुलुमही करितो. ६

शत्रूच्या पक्षानें
धैर्य धरोनी लढाइ केली जी,
ती चाले क्षणभर जों
मुख्य तयांचा नृपास हो राजी. ७

शक्ति गळाली त्याची
तेव्हां ये शरण दीन होऊन,
स्वामीच्या पदिं मस्तक
टेवी उन्माद सर्व सोडून. ८

[ शिखरिणी ]

" तुला आलों स्वामी! शरण, करिं माझ्यावर कृपा,
" अनाथाला यावें अभय सदया! हे मज नृपा!
" क्षमेला आहें मी खचित नवरा! योग्यच जरी,
" अभाग्याचें आतां करुणहृदया रक्षण करीं." ९

---

१ त्या बंडखाल्याचा सेनाधिपती.

[ मालिनी ].

" दोषी आहे मजसि न असे यांत संदेह कांहीं,
" दंगा जेव्हां करविं तयिं मी चिंतिलें फार नाहीं,
" या कर्माचा सहज परि रे होई संताप आतां,
"न्यायी राजा असशि तरि तूं तार गा या अनाथा!"

[ आर्या ]

ऐसा आळवि जेव्हां
मोगल सरदार त्या उदारास,
तेव्हां येई तन्मनिं
फार दया ह्मणुनि सोडि तो त्यास. ११
गिरिशिखरावर होतें
राजाचें सैन्य ठाण देऊन,
ज्यामधिं लोक शतद्वय
राहति सारे सुधैर्य ठेऊन. १२
पांच हजार जनांची
टोळी परि शत्रुची असे दूर
त्यांत लढाऊ होते,
तैसे असती महान ते शूर. १३
आलें नाहीं मंडळ,
हें त्यांतें प्रथम साह्य करण्याला,
मोड तयांचा झाला,
ठाउक नव्हतीच गोष्ट ही ज्याला. १४

येती चढुनी सत्वर
अकबरसेनेवरी पहा वेगें,
तेणें या पक्षांतिल
लोकांला परत जावया लागे. १५
राजाच्या सरदारां-
पैकीं कांहीं तयार युद्धाला
होते, परि कांहींचा
धीर मुळीं जावया न हो झाला. १६

[ इंद्रवज्रा ].

" आले पहा चालुनि हे बळानें,
" आतां पळावें बहुधा त्वरेनें,
" राहे न कांहीं दुसरा उपाय,
" चालून गेल्यास घडे अपाय." १७
बोलावया यापरि लागले ते,
कोणासही भान न फार होतें;
मागें फिराया झटती भयानें,
राजास हो संभ्रम प्राप्त यानें. १८

[ शालिनी ].

सल्ला नाहीं वाटली योग्य त्याला,
वेगें चाले जावया धीर झाला,
शूरत्वानें पाय मागें हटेना,
जिंकायाची कामना ती सरेना. १९

[ द्रुतविलंबित ]

" सर करानि" अशा हुकुमा करी,
सकळ दुंदुभि वाजविती करीं,
रफ्‌ पट्टा मग शोभतसे खरें,
परत धैर्य जणों बहु ये लरें. २०

[ आर्या ]

यापरि जय मेळविला
त्या राजानें हणोनि शत्रूतें
दाणादाण तयांची
करुनी दावीतसे स्वशौर्यातें. २१

[ भुजंगप्रयात ].

सुभेदार दाऊद येथील होता,
जयाशीं लढाया बळानेंच जातां
घडे द्वंद्व मोठें, मुळीं नावरे तें
असें वीर्य हो बादशाहास येतें. २२

[ शालिनी ]

मैदानीं ते येउनी होय कुस्ती,
शत्रूची तो राय मोडीच मस्ती,
दोघांमध्यें पेंच होती अनेक,
देखाया हें झुंजती फार लोक. २३

[ भुजंगप्रयात ]

सुभेदार पाडावया पाहि यातें,
तसें बादशाहासही चिंत्ति होतें,

पहा एक झोंबे दुज्यालागिं जेव्हां,
खरे भांडती जीव घेण्यास तेव्हां. २४
"अहो काय होईल आतां कळेना !"
अशी गर्जना काढिते सर्व सेना,
तिजा त्यांमधीं आपुलें अंग देता,
तरी होउनी चूर्ण तेव्हांच जाता. २५

[ आर्या ].

"आतां मी मृत्यूतें
"पावतसें यांत नाहिं संदेह,"
ऐसें पाहुनि सोडवि
हळुच सुभेदार आपला देह. २६
काढी पळ जलदीनें
घेउनि हातांत जीव नेणों कीं,
मागें पाहे न मुळीं
इतकी हो प्राप्त लाज त्या लोकीं. २७
अनुयायींही त्याचे
पुनरपि दिसती न त्या रणामाजीं,
जेणें अकब्बराला
यश लाभे थोर आपल्या काजीं. २८
यानंतर जों नृपती
येई फिरुनी स्वराजधानींत,

तों नगरांतिल लोक
प्रभुला भेटावयास येतात. २९
देश सुधारायास्तव
यत्न करी थोर थोर तो चतुर,
जे जें हित लोकांना
घडवी तें द्रव्य खर्चुनी प्रचुर. ३०

[ इंद्रवज्रा ].

बागा मळे यांस सहाय्य देई,
उत्पन्न तेणें मग थोर होई,
सारा जमीनीवरचा उणा घे,
उत्कर्ष देशामधिं होइ वेगें. ३१
लोकांवरी जो कर फार होता,
झाला तयां जो बहु त्रासदाता,
तो काढुनी तोषवितो जनांस,
त्यांच्या तदा वाढवितो सुखास. ३२
मार्गीं लुटारू पथिकांस फार
तेव्हां बळें नाडिति, दुःख थोर,
राया तयांते धरवोनि आणी,
ते शासना भोगिति चोर कोणी. ३३
ऐशी व्यवस्था करुनी प्रजेतें
देई सुसौख्य, न गणी श्रमातें,

ज्या ज्या ठिकाणीं नृप पातलासे,
तेथील तें दुःख तयींच नासे. ३४

[ द्रुतविलंबित ]

दरवडे दडपी अवघे तदा,
जिरवि दुष्ट जनीं सगळ्या मदा,
जळ जसें पडुनी अनळावरी
निजबळेंच तदीय बळा हरी. ३५

[ पृथ्वी ].

तलाव विविधस्थळीं करवुनीं तृषेला हरी,
तशाच विहिरी कुठें जन सुखार्थ राजा करी,
महान नद बांधवी क्वचिदसंख्यवित्तव्ययें
पराक्रम तदीय हा वघुनि कीर्ति कीं लोकिं ये. ३६

[ इंद्रवज्रा ]

कोण्या स्थळीं बांधवि धर्मशाळा,
देखावया जाइ अनेक वेळां,
जेथें गरीबांस्तव सोय केली,
तेणें भिकाऱ्यांस सुखाप्ति झाली. ३७
रस्ते नवे बांधविले तयानें,
व्हावें जनाला अति सौख्य जेणें,
वस्ती ठगांची तशि मोडली ती,
जे अन्य देशीं पळुनीच जाती. ३८

ठेवी शिबंदी करण्यास रक्षा;
जे दांडगे देइ तयांस शिक्षा;
पोलीस खातें बहु वाढवोनी;
नेमी हवालदार सदा इमानी. ३९

[ आर्या ]

राज्यांत टंकशाळा
नाणें करण्यास कांहिं बांधविल्या,
मोहराही सोन्याच्या
जेथें कौशल्ययुक्त घडवील्या. ४०

## अकबरी मोहोरेविषयीं गोष्ट.

कोणी एकस्थानीं
राहे मोठा महंत दरवेशी,
जादू ठावी ज्याला,
किमया कांहीं असेहि ज्यापाशीं. ४१
राजाश्रय त्यास असे,
परिचय मोठा तसाच राजाचा,
धर्मिष्ठ वृत्ति होती,
निश्चय सत्यावरी असे ज्याचा. ४२

[ शालिनी ]

तांब्याचें तो दावि सोनें करोनी,
रानामध्यें औषधी मेळवोनी;

शिष्ये त्याचे पाहती मौज नित्य,
अन्याला हें ठाउकें नाहिं कृत्य. ४३
राजा भक्तिप्रेम तो फार दावी,
तत्रापी ही गोष्ट त्याला न ठावी.
वैरागी तो सुज्ञ होता ह्मणून,
सांगेना त्या जादुची कांहिं खूण. ४४

[ इद्रवज्रा ].

ऐशापरी काळ बहूत गेला,
नाहींच वृत्तांत कळून आला,
एके दिनीं त्याप्रति भेट द्याया
ये भूपती सेवक घेउनीया. ४५

[ शिखरिणी ]

ह्मणे राया तेव्हां "गुरुजि! मज सांगोनि किमया
"करावी ही माझ्यावर उपकृती सुज्ञ सदया!
"जरी आहें चेला बहुत दिन मी दीन तुमचा
"तरी व्हावा कांहो मजवरि न तो लोभ गुरुचा? ४६

[ पृथ्वी ].

"कृपाकरुनि सांइजी! विदित गूढ हें आगळें
"कराल तरि तूमचें मन खुपी असें तें कळे.
"अनुग्रह गुरू जरी करि न, शिष्य कैसा तरे?
"ह्मणोनि किमया मला समजतां व्यथा संहरे[१]. ४७

---

१. दूर होईल

[ इंद्रवज्रा ].

" राज्यांत कीर्ती तुमचीच होई,
" झाले जरी लोक समृद्ध, सांई !
" हीं नाममात्रें धनि या जनांचा,
" सारा असे गौरव सद्गुरूचा. ४८

[ भुजंगप्रयात ].

" तुह्मांसारखे राहती जे महंत,
" महा शक्ति ज्यांची नसे जीस अंत,
" ह्मणोनी नसे भीति राज्यास कांहीं,
" परी अन्यथा रक्षिता कोणि नाहीं. ४९

[ आर्या ]

" गोष्ट खरी ही आहे
" जरि तरि सांगावयास कां बाध,
" ही सांपडली विद्या
" नाहीं, केला गुरो ! बहू शोध." ५०

[ द्रुतविलंबित ]

करित आर्जव यापरि पुष्कळ,
अकबरास तरी न मिळे फळ,
विनवितो बहुरीति परोपरी
नच गुरू शिकवी किमया परी. ५१

[ शार्दूलविक्रीडित ].

"जादू मी तुजला प्रभो! शिकवितां होशील उन्मत्त रे!
"यासाठीं विनती तुझी न करितों मान्य स्वयें सादरें,

"राजा तूं ह्मणुनी तुला न कमती कांहीं असे, हें खरें,
"आशा व्यर्थ धरूं नको बहुतशी हो स्वस्थ वत्सा बरें ५२

[ भुजंगप्रयात ].

" भिकारी विचारा अभागी असें मी,
" न भोगी जगांतील त्या वस्तु नामी,
" असे पर्णशालेमधीं वास माझा,
" न लावीं परी जादु ही द्रव्यकाजा. ५३

[ शालिनी ]

" ईशानें त्या दीधली शक्ति मातें,
" तेणें त्याचा खेळ दावीं जगातें,
" चिंता माझी तोच वाहे कृपाळू,
" तेव्हां आज्ञा केंवि त्याची न पाळूं? ५४

[ द्रुतविलंबित ].

" सदुपयोग करील तया मिळे
" प्रभु कृपा, न दुजांप्रति ती वळे,
" विसरतांच अनुग्रह ईश तो
" सकलही फल सत्वर हारितो. ५५

[ मालिनी ]

" अनुपम किमया रे ! हातिं देतां तुझ्या ती
" घडति बहुत पापें, दोष मोठेच होती,
" तरि सकळ नृपा ! या आग्रहातें त्यजावें
" स्वमनिं धरिं न कोपा स्वाश्रमीं स्वस्थ जावें. ५६

[ स्वागता ].

"जें तुला प्रभुकृपें दिलें असे,
"त्यांत सौख्य गणुनी सदा वसें,
"चित्त शांत असतां दुजा कसा
"लाभ थोर जगतींत कायसा? ५७
"द्रव्यराशि पडल्या गृहीं जरी
"तुष्ट हो न मन हें तुझें तरी
"अन्य नाहिं किमया खरोखरी
"नित्य शांतसुखवृत्तिच्या परी." ५८

[ आर्या ]

दिन गेल्यावर कांहीं
युक्ति सुचे त्या नृपास ही बरवी,
जीच्या सामर्थ्यानें
किमया सत्वर पहा कशी हरवी. ५९
फितुर करोनी शिष्या
गुरुचा द्रव्यें, तयास राय पुसे,
"तांब्याचें सोनें करि
"मित्रा! मज सांग निर्भयेंच कसें? ६०
"आहे कोठें जागा?
"कोण असे वेळ ती कशी काय?
"इतका उपकार तुझा
"माझ्यावर फार रे! गड्या! होय!" ६१

[ इंद्रवज्रा ].

तें स्थान शिष्या मग त्यास सांगे,
ज्यांला धनाचा बहु लोभ लागे,
वस्त्रें तया सर्वहि देउनीयां
एके दिनीं ये नृप त्याच ठायां. ६२
तों औषधें घेउनि कांहिं त्यांचा
आहे गुरू तो वनवीत सांचा,
त्या स्थानिं जावोनिच बादशाहा
पाहोनि बोले," गवसे, अहा! हा! ६३

[ आर्या ]

घेउनि त्या शिष्याचीं
वस्त्रें चेला स्वतांच तो बनला,
गुरुजी थोडा होता
अंध ह्मणोनी तया नसे दिसला. ६४

[ शिखरिणी ].

गुरूला वाटे कीं जवळ मम शिष्या वसतसे,
नृपाला तो सांगे ह्मणुनि, " मिळवीं औषध असें,"
तयाच्या आज्ञेला अनुसरुन तें राय करितो,
महा चातुर्यानें सकल मग भट्टी समजतो. ६५

[ इंद्रवज्रा ].

सर्वौषधी ठाऊक होति त्याला
तैशी क्रिया पाहुनि हर्ष झाला,

---

१ मूस.

ती पूर्ण चित्तांतिल होय आस
मोठया लरें जाइ तदा गृहास. ६६

[ भुजंगप्रयात ]

कळलिं गुरूला पुढें वर्तमान,
तयाचा गळे तत्क्षणीं सर्व मान,
परी निंद्य हें कर्म केलें नृपानें
मिळेना तया सिद्धता ती अशानें. ६७

[ आर्या ].

यानंतर गुरुजीनें
केला शिष्यावरी अनुग्रह तो,
नृप त्या किमयायोगें
नगरीं सोनें बहूत बनवीतो. ६८
शिष्यालाही निंदी
दोष तयाचा तयास दाउनियां,
उपदेशाच्या योगें,
तच्चित्ताच्या वरी करी घाया. ६९
" विश्वासघातकी तूं !
" भुललाशी राजवित्त पाहून,
" दुष्टा कृतघ्न दुसरा
" कोण असे रे ! पहा तुझ्याहून ? ७०
" द्रव्यासाठीं वर्त्तें
" बदलुनि तूं बेइमान होशी कां ?

" माझा शिष्या ह्मणवुनि
" नांवाचा करिशि यापरी डंका !" ७१

[ शालिनी ].

अजुनि पडति दृष्टी मोहरा सोनियांच्या,
अकबर नृप याच्या वेळि ज्या होति सांच्या,
बहुत रुचिर ज्यांचें हेम ही फार ख्याती,
सकळ जन जयांची कीर्ति अद्यापि गाती. ७२

---

## [ विद्वज्जनप्रार्थना ].

चरित अकबराचें वर्णिलें अल्प जें हें
मजसि गमतसे तें दोषसंयुक्त आहे,
तदपि बुधजनांनीं गोड मानून घ्यावें
कवन मज कराया सुज्ञहो ! धैर्य द्यावें.

समाप्त.